पान १ वरून

## पूरंदर विमानतळाशिवाय पर्याय नाही : शरद पवार

करून १,२८५ हेक्टर (सुमारे ३,१७५ एकर) इतकी केली. तरीही शेतकऱ्यांनी २३ ऑगस्ट रोजी स्पष्ट इशारा दिला की, अधिग्रहण कमी केले तरी ते आंदोलन मागे घेणार नाहीत. अधिकृत अधिसूचना काढण्याची मागणी त्यांनी केली आहे. पारगाव ग्रामसभेने प्रकल्प नाकारत एकमताने ठराव केला आहे. आमच्या संमतीशिवाय जमिनीचे अधिग्रहण अवैध ठरेल आणि ते आमच्या अधिकारांचे उल्लंघन असेल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. गावकऱ्यांनी आधार-जमीन रेकॉर्ड लिंकिंग व वर्गीकरणालाही विरोध दर्शवला आहे. हा ठराव तहसीलदार, जिल्हाधिकाऱ्यांसह एमआयडीसी, एमएडीसी आणि नागरी विमान वाहतूक मंत्रालयाकडे पाठविण्यात येणार आहे.

**उच्चस्तरीय बैठक आणि संघर्षाची पार्श्वभूमी**

जुलै २०२५ मध्ये मुंबईत झालेल्या उच्चस्तरीय आढावा बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विमानतळाच्या कामाला वेग देण्याचे निर्देश दिले होते. मे २०२५ मध्ये सरकारी सर्वेक्षणावेळी निदर्शक शेतकरी आणि पोलिसांमध्ये संघर्ष झाला होता. लाठीमारापर्यंत परिस्थिती गेली होती.

**विद्यमान विमानतळाची मर्यादा**

सध्या पुणे विमानतळ लोहेगाव येथील भारतीय हवाई दलाच्या तळावरून कार्यरत आहे. संरक्षण दलाच्या निर्बंधांमुळे विस्तार अशक्य झाला आहे. त्यामुळे पुरंदर येथे स्वतंत्र आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्यावर सरकार आग्रही आहे.

एका बाजूला शरद पवार यांनी पूरंदर विमानतळाशिवाय पर्याय नाही असे ठामपणे सांगितले आहे, तर दुसरीकडे शेतकरी आपले आंदोलन सुरूच ठेवत आहेत. त्यामुळे हा प्रकल्प गतीमान होतो की पुन्हा एकदा संघर्षाच्या भोवऱ्यात अडकतो, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

## शहरातील मेट्रो विस्तारीकरणाच्या सविस्तर प्रकल्प अहवालाचे सादरीकरण

होता त्यानुसार शहरातील मेट्रो विस्तारीकरणात भक्ती शक्ती चौक – मुकाई चौक, किवळे – भुजबळ चौक, वाकड साई चौक, जगताप डेअरी – कोकणे चौक, नाशिक फाटा – संत तुकाराम नगर चौक, गवळी माथा चौक, भोसरी डिस्ट्रीक सेंटर, गोडाऊन चौक – चाकण या महत्त्वाच्या मार्गांचा समावेश आहे. या बैठकीस पिंपरी चिंचवड शहरातील माननीय खासदार, आमदार, सर्व पक्षांचे नेते व पदाधिकारी यांना महामेट्रोच्या अधिकाऱ्यांनी प्रकल्पाचे सविस्तर सादरीकरण करून तांत्रिक, आर्थिक व कार्यान्वयनाशी संबंधित बाबींची माहिती दिली. या प्रसंगी मान्यवरांनी प्रकल्पाच्या उपयुक्ततेबाबत सूचना व मते नोंदविली. यावेळी स्थानिक लोक प्रतिनिधींनी या प्रकल्प मार्गातील काही बदल सुचविले आहेत. या बैठकीत मेट्रो अलाईनमेंट नाशिकफाटा -भोसरी अशी करण्याबाबत विचार करावा, भोसरीतील सध्याचा उड्डाणपूल अडथळा ठरत असेल तर तो काढून घ्यावा आणि गोडाऊन चौक ते चाकण या मार्गाप्रमाणेच एकसारखी रचना नाशिकफाटा ते चाकण पर्यंत करावी व त्याची तांत्रिक पडताळणी ८ दिवसात करावी. तसेच भुजबळ चौक वाकड येथील दोन्ही मेट्रो मार्गाची रचना प्रवाशांना सोईस्कर असावी, ऋमेट्रो स्टेशन च्या जवळपास पार्किंग व्यवस्था करण्यात यावी या विषयांवर चर्चा करण्यात आली.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पादचारी पूलाचे उद्घाटन

'केबल स्टेड ब्रिज' आहे, जो अभियांत्रिकी आणि कलेचा एक उत्कृष्ट संगम दर्शवतो. पुण्याच्या सांस्कृतिक परंपरेचा सन्मान करण्यासाठी या पुलाची रचना तानपुऱ्याच्या आकारासारखी करण्यात आली आहे. तांत्रिकदृष्ट्या हा पूल १७९.७९१ मीटर लांब आणि ८ मीटर रुंद आहे. यामध्ये ७२.२६९ मीटर उंचीचा एक खास ७०-डिग्री कललेला काँक्रीटचा पायलन वापरण्यात आला आहे, फक्त पादचाऱ्यांसाठी नदीवर बांधण्यात आलेला अशा प्रकारचा हा पुणे शहरातील पहिलाच पूल आहे. या पुलामुळे मेट्रो प्रवाशांना थेट मेट्रो स्टेशनवर पोहोचता येईल. तसेच, हा पूल पुणे शहरातील पादचारी चळवळीला प्रोत्साहन देईल आणि लोकांना मेट्रो स्थानकात तसेच पुढे परस्पर जंगली महाराज रस्त्यापर्यंत चालत जाण्यासाठी एक सुरक्षित आणि सुंदर मार्ग उपलब्ध झाला आहे. पुणे मेट्रो टप्पा १ मध्ये पिंपरी चिंचवड मनपा ते स्वारगेट आणि वनाझ ते रामवाडी असे दोन मार्ग आहेत. या दोन्ही मार्गांवर दररोज ५५४ मेट्रो फेऱ्यांद्वारे दोन लाखांपेक्षा जास्त प्रवासी प्रवास करतात. या नवीन पुलामुळे शहराच्या मध्यवस्तीत दाट लोकवस्ती असणाऱ्या भागातील आणखी प्रवाशांना मेट्रोचा लाभ घेणे शक्य होणार आहे.

## देशभरातून अनेक दलित नवउद्योजक निर्माण होणार : पद्मश्री मिलिंद कांबळे

च्या खरेदी धोरणे, पुरवठा साखळीतील संधी, आवश्यक साहित्य व तांत्रिक बाबींची माहिती देण्यात आली. तसेच उद्योजकांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी प्रश्नोत्तर सत्र आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचा मुख्य हेतू म्हणजे अनुसूचित जाती-जमातींचे उद्योजक, स्टार्टअप्स यांना अलिमको च्या खरेदी प्रक्रियेशी जोडणे व त्यांना थेट व्यवसायाच्या संधी उपलब्ध करून देणे हा होता. या माध्यमातून अनुसूचित जाती व जमाती उद्योजकांना देशाच्या औद्योगिक प्रवाहात सक्रिय सहभाग घेण्याची आणि त्यांच्या व्यवसायवृद्धीला चालना देण्याची संधी मिळाली. समारोप सत्रामध्ये डिक्कीचे सदस्य व मार्गदर्शक निवेदिता कांबळे यांनी आभारप्रदर्शन केले. कार्यक्रमानंतर नेटवर्किंगचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये उद्योजकांना डिक्की व अलिमको च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधण्याची संधी मिळाली. अलिमको ही संस्था कृत्रिम अवयव, सहाय्यक साधने व पुनर्वसन उपकरणे निर्मितीमध्ये देशभरात अग्रगण्य आहे. या कार्यक्रमामुळे स्टील, प्लास्टिक, रबर, फोम, फॅब्रिक्स, बेअरिंग्स, मोटर्स व विविध अभियांत्रिकी व फॅब्रिकेशन क्षेत्रातील उद्योजकांना पुरवठादार होण्याची सुवर्णसंधी मिळाली. विशेष विक्रेता विकास कार्यक्रमामुळे स्थानिक अनुसूचित जाती व जमाती उद्योजकांसाठी व्यवसाय विस्तार, नवीन बाजारपेठ निर्माण आणि शाश्वत रोजगार निर्मितीच्या नव्या संधी खुल्या झाल्या.

## मुख्यमंत्री पुणे दौऱ्यावर; मराठा आंदोलकांना घेतले ताब्यात

या घडामोडींमुळे ''सरकार खरोखरच मराठा समाजाच्या प्रश्नाबाबत गंभीर आहे का?'' असा प्रश्न उपस्थित होत आहे. कारण, एका बाजूला मुख्यमंत्री उत्सव आणि विकासकामांच्या उद्घाटनात गुंतलेले असताना, दुसऱ्या बाजूला हजारो आंदोलक आझाद मैदानावर ठाण मांडून बसले आहेत.

# विश्रामबाग ट्रस्टकडून दक्षिणेश्वरी काली मंदिरची प्रतिकृती




**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील विश्रामबाग मित्र मंडळ ट्रस्ट ह्यावर्षीच्या गणेशोत्सवात भक्तांसाठी एक अद्वितीय व ऐतिहासिक देखावा घेऊन आला आहे. मंडळाने कोलकात्याचे सुप्रसिद्ध दक्षिणेश्वरी काली मंदिर याची भव्य प्रतिकृती साकारली आहे. ही प्रतिकृती २५ फूट रुंद ÷ २५ फूट लांब व तब्बल ५० फूट उंच असून, पुण्यातील भाविकांना कोलकात्याच्या धार्मिक व सांस्कृतिक वारशाची अनुभूती मिळवून देणारा आहे.

देखाव्याची वैशिष्ट्ये

संपूर्ण मंदिराचे आरस स्वरूपातील कलात्मक सादरीकरण, ५० फूट उंचीवर आकर्षक शिल्पकला व सुंदर कोरीवकाम , अद्ययावत विद्युत सजावट व थक्क करणारी प्रकाशयोजना, भाविकांना प्रत्यक्ष दक्षिणेश्वरी काली मंदिराच्या वातावरणाचा अनुभव मंडळाचा सामाजिक उपक्रमांचा वारसा विश्रामबाग मित्र मंडळ ट्रस्ट गेली अनेक वर्षे सामाजिक जबाबदारी जपत गणेशोत्सव साजरा करीत आहे. यावर्षी देखील मंडळाने विविध उपक्रम आखले आहेत :

शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना मदत, गरजू विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य वाटप, मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर, गरीब कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले आहे. मंडळाचे अध्यक्ष नितीन कोतवाल, उपाध्यक्ष संतोष जगताप, कार्याध्यक्ष रवींद्र जाधव हे आहेत.

## 'ब्रेक द चेन' अंतर्गत डेंग्यू-मलेरिया जनजागृती!

**चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका वैद्यकीय विभागाच्या वतीने, तालेरा हॉस्पिटल झोनमधील साईनगर, मामुर्डी, किवळे, चिंतामणी चौक, पुनावळे आणि इतर भागांमध्ये डेंग्यू-मलेरिया प्रतिबंधक जनजागृती मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान नागरिकांना डास निर्मूलनासाठी घरगुती आणि सार्वजनिक उपाय, पाणी साचू न देण्याचे महत्त्व, तसेच डेंग्यू व मलेरियाची लक्षणे ओळखून त्वरित उपचार घेण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन देण्यात आले. यावेळी परिसरात साचलेल्या पाण्याची, फुलदाण्यांची, टाक्या, टायर्स आणि ड्रम यासारख्या डास प्रजननासाठी पोषक ठिकाणांची तपासणी करून आवश्यक ती कारवाई करून नष्ट करण्यात आली.

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने 'भटके विमुक्त दिवस' उत्साहात साजरा...



**पिंपरी । प्रतिनिधी**

देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात भटक्या विमुक्त समाजाचे स्वातंत्र्याच्या चळवळीतील व राष्ट्रउभारणातील योगदान लक्षात घेऊन त्यांच्या सन्मानार्थ ३१ ऑगस्ट हा दिवस ''भटके विमुक्त दिवस'' म्हणून राज्यात सर्वत्र साजरा करणेबाबत महाराष्ट्र शासनाने नुकतेच परिपत्रक निर्गमित केलेले होते. त्यानुसार महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त शेखर सिंह यांचे निर्देशानुसार तसेच उप आयुक्त आण्णा बोदडे यांच्या मार्गदर्शनाखाली ''भटके विमुक्त दिवस'' उत्साहात साजरा करण्यात आला.

भाटनगर,पिंपरी येथील आयोजित केलेल्या कार्यक्रमात महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाच्या वतीने विद्यार्थी शिक्षण व इतर योजनांची माहिती जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी उपस्थित विद्यार्थी व पालकांना दिली. या योजनांचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थी व बांधवांनी घ्यावा असे आवाहन देखील महापालिकेच्या वतीने करण्यात आले.

याप्रसंगी माजी महापौर कविचंद भाट,सामाजिक कार्यकर्ते मनोज माछरे, विकी तामचीकर, सुभाष माछरे,भुपेंद्र तामचीकर,अभय भाट, सनी मलके, राज माछरे, नरेंद्र तामचीकर, अक्षय माछरे तसेच शालेय विद्यार्थी आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते.



स्वच्छ पुणे अभियान अंतर्गत मा. महापालिका आयुक्त श्री. नवल किशोर राम यांनी नगर रोड वडगाव शेरी क्षेत्रीय कार्यालयांतर्गत परिसरामध्ये आज दिनांक १/९/२०२५ रोजी पाहणी केली. यावेळी मा.श्री संदीप कदम उपायुक्त घनकचरा व्यवस्थापन श्री माधव जगताप, मा. उपायुक्त परिमंडळ क्रमांक १, श्रीमती शीतल वाकडे, मा. महापालिका सहाय्यक आयुक्त यांचे सह संबंधित सर्व वरिष्ठ आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक व मुकादम तसेच ह्यूमन मॅट्रिक्सची संपूर्ण टीम इत्यादी उपस्थित होते. यावेळी मा. महापालिका आयुक्त यांनी सार्वजनिक स्वच्छतेचे अनुषंगाने सर्व उपस्थित यांना स्वच्छ पुणे अभियान यशस्वीपणे पार पाडण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले. मा. महापालिका आयुक्त यांनी या पाहणी दौऱ्याच्या अनुषंगाने आवश्यक नियोजन करण्यासाठी बैठक घेण्याचे आदेशित केले व त्या अनुषंगाने क्षेत्रीय कार्यालय स्तरावर बैठक घेण्यातआली.

# तांत्रिक बिघाडामुळे पुणे-दिल्ली स्पाइसजेटचे विमान परतवावे लागले

**पुणे । प्रतिनिधी**

पुणेहून दिल्लीला निघालेल्या स्पाइसजेटच्या विमानाला उड्डाणानंतर तांत्रिक बिघाड जाणवला. तत्काळ वैमानिकाने विमानतळ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून पुण्यात परत उतरण्याची परवानगी मागितली. परवानगी मिळाल्यानंतर विमान कोणत्याही अपघाताविना सुरक्षितपणे उतरवण्यात आले.

घटनेनंतर सुरुवातीला काही प्रवाशांनी ही आपत्कालीन लँडिंग असल्याचे सांगितले. मात्र विमानतळ अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, अशी कोणतीही आपत्कालीन प्रक्रिया राबवली नव्हती. विमान नियोजित वेळेनुसार पुण्याहून उड्डाण केले




होते; परंतु हवेत असताना तांत्रिक अडचण आढळून आल्याने ते परत बोलावण्यात आले. विमान सुरक्षित उतरल्यावर अभियंते तांत्रिक तपासणीसाठी तैनात करण्यात आले. तसेच प्रवाशांची व्यवस्था एअरलाइनकडून करण्यात आली. विमानतळ प्रशासनाने पुष्टी केली की या घटनेत कोणत्याही प्रवाशाला दुखापत झाली नाही किंवा मोठा व्यत्यय निर्माण झाला नाही. दरम्यान, बिघाडाचे नेमके कारण शोधण्यासाठी तपास सुरू आहे.

## प्रदूषणमुक्तीसाठी उपनद्या, नाल्यांवरही प्रक्रिया गरजेची : मुरलीधर मोहोळ

**पुणे । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील प्रमुख नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी सुरू असलेल्या प्रकल्पांना गती मिळाली असली तरी केवळ मोठ्या नद्यांवर लक्ष केंद्रीत करून उपयोग होणार नाही. त्यात मिळणाऱ्या उपनद्या, नाले व गटारांवर देखील शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया होणे अत्यावश्यक आहे, असे मत केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केले. यासाठी स्वच्छ भारत मिशन अंतर्गत जिल्हा परिषदेकडून १० नवे प्रकल्प राबवले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती (दिशा) आढावा बैठकीत मोहोळ बोलत होते. यावेळी नगरविकास व सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार श्रीरंग बारणे, आमदार बापूसाहेब पठारे, आमदार बाबाजी काळे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखरसिंह, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. मोहोळ म्हणाले की, ग्रामीण व शहरी भागातील गटार व औद्योगिक सांडपाणी थेट नद्यांमध्ये मिसळल्यामुळे जलप्रदूषण गंभीर होत चालले आहे. यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था व नियोजन प्राधिकरणांनी परस्पर समन्वय साधावा. त्यासाठी लवकरच पुणे महापालिका, पिंपरी चिंचवड महापालिका, पीएमआरडीए व जिल्हा परिषद यांची संयुक्त बैठक होणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

# पुण्याच्या नरेंद्र धायगुडे यांचा विश्वविक्रम : विष्णू शंखावर भारतीय संगीताची सरगम

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील संगीतकार नरेंद्र धायगुडे यांनी विष्णू शंखावर भारतीय संगीतातील स्वर – सा रे ग म प ध नी – तसेच विविध सुर वाजवण्याचे अनोखे तंत्र विकसित करून जागतिक पातळीवर विक्रम नोंदवला आहे.

या नाविन्यपूर्ण कलात्मक प्रयोगाची नोंद वर्ल्ड रेकॉर्ड्स इंडियाकडून अधिकृतरीत्या करण्यात आली असून, हा पुरस्कार धायगुडे यांना ८ ऑगस्ट २०२५ रोजी श्री क्षेत्र देहू येथे संत तुकाराम महाराजांचे वंशज ह.भ.प. माणिक महाराज मोरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी वर्ल्ड रेकॉर्ड्स इंडियाचे सीईओ पवन सोलंकी उपस्थित होते.

धायगुडे यांनी या अभिनव तंत्राचे प्रात्यक्षिक त्यांच्या यूट्यूब चॅनेलवर उपलब्ध करून दिले आहे. शंख हा केवळ धार्मिक वाद्य न राहता स्वतंत्र संगीत वाद्य म्हणून प्रस्थापित करण्यासाठी ते वैज्ञानिक संशोधन करत आहेत. तसेच, या दुर्मिळ कलाप्रकारात रस असलेल्या संगीतप्रेमींना मार्गदर्शन करण्याचा त्यांचा मानस आहे.

हा विक्रम केवळ धायगुडे यांचा व्यक्तिगत सन्मान नसून, पुण्याच्या सांस्कृतिक परंपरेलाही अभिमानाचे पर्व मानला जात आहे.

